RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष ५, अंक ८८ (४)]** **शुक्रवार, जुलै ५, २०१९ /आषाढ १४, शके १९४१** **[पृष्ठे १२, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक २१७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जुलै २०१९

### अधिसूचना

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक संकीर्ण एडीआर-२०१९/प्र.क्र.७६/तांशि-६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्याव्यसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८) च्या कलम २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पुर्णवेळ व्यावसायिक पदवीपुर्व दृष्यकला पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०१७ यांमध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्याव्यसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व दृष्यकला पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्याव्यसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व दृष्यकला पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०१७ (या पुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम ४ चा उपनियम (३), वगळण्यात येईल.

३. मुख्य नियमांच्या ९. ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

**“९. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप),—**

(**१**) विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ही अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (कॅप) उमेदवारांना प्रवेश देईल. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे (कॅप) टप्पे खाली नमूद केल्याप्रमाणे असतील,—

(क) सक्षम प्राधिकाऱ्याने माहिती पुस्तिका प्रदर्शित करणे किंवा प्रसिद्ध करणे ;

(ख) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमध्ये भाग घेण्यासाठी उमेदवाराने आवेदनपत्राचा नमुना ऑनलाईन पद्धतीने भरणे ;

(ग) ऑनलाईन पद्धतीने आवेदनपत्राचा नमुना भरताना प्रवेशाच्या आवश्यकतांनुसार आवश्यक असलेल्या वैध प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतीच्या स्कॅन छायाप्रती ऑनलाईन अपलोड करणे ;

(घ) उमेदवाराने सुविधा केंद्रावरून कागदपत्रांची पडताळणी करून घेणे. आवेदनपत्रात केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी सादर करणे उमेदवारास बंधनकारक असेल.

(ङ) तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे किंवा त्या प्रसिद्ध करणे, कोणत्याही तक्रारी, असल्यास, त्या दाखल करून घेणे आणि अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे किंवा त्या प्रसिद्ध करणे;

(च) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) (त्या त्या फेऱ्यांसाठी) उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागा (जागांचे नियतवाटप) प्रदर्शित करणे;

(छ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) त्या त्या फेऱ्यांच्या अगोदर पाठ्यक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाईन विकल्प नमुना भरणे व त्यास पुष्टी देणे. उमेदवारांना, सक्षम प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या पसंतीक्रमानुसार संस्था व पाठ्यक्रम याबाबतचे पसंतीक्रम उतरत्या क्रमाने भरता येतील. उमेदवाराने विकल्प नमुन्यास पुष्टी दिली की मग, तो विकल्प नमूना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या संबंधित फेऱ्यांमध्ये जागा वाटपासाठी विचारात घेण्यात येईल ;

(ज) वाटप केलेली संस्था आणि पाठ्यक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) संबंधित फेऱ्यांमधील तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे;

(झ) सक्षम प्राधिकाऱ्याने घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार उमेदवाराने प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होऊन वाटप करण्यात आलेल्या जागेची स्वीकृती करणे ;

(त्र) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) अंतिम वाटपानुसार वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घेण्य़ासाठी उमेदवाराने वरील खंड (झ) नुसार प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होऊन प्रवेश निश्चित झाल्य़ानंतरच वाटप केलेल्या संस्थेमध्ये हजर व्हावे.

(ट) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेच्या (कॅप) विविध टप्प्यांसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून विहित करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे पालन करणे बंधनकारक असेल.

**(२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅप) पहिली फेरी आयोजित करणे,—**पहिल्या प्रवेश फेरी करिता उपलब्ध असलेल्या जागा संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येतील. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) अंतिम गुणवत्ता यादीत ज्या उमेदवारांची नावे असतील असे उमेदवार ऑनलाईन विकल्प नमुना भरून या फेरीत सहभाग घेण्यास पात्र असतील. उमेदवार त्यांच्या लॉग-इन मधून विकल्प नमुना भरून त्यास पुष्टी देतील.

**(३) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान (कॅप) : —**

(क) उमेदवारास त्याच्या पहिल्या पसंतीक्रमावरील जागेचे वाटप झाल्यास, असे वाटप प्रणालीतून आपोआप गोठविले जाईल व उमेदवार अशा वाटप केलेल्या जागेचा स्वीकार करील. त्यानंतर असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील. असे उमेदवार नंतर प्रवेश उपस्थिती केंद्रावर कागदपत्रांची पडताळणी व जागा स्वीकृती शुल्क भरण्यासाठी हजर होतील. तदनंतर असे उमेदवार वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घेण्यासाठी, वाटप करण्यात आलेल्या संस्थेमध्ये हजर होतील व त्या जागेसाठी प्रवेश घेतील. असा उमेदवार जर प्रवेश उपस्थिती केंद्रावर जागा स्वीकृतीकरिता हजर झाला नाही तर, तो त्याला वाटप करण्यात

आलेल्या जागेवरील त्याचा हक्क आपोआप गमावील आणि ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. अशा उमेदवारांकरिता करण्यात आलेले हे जागावाटप अंतिम असेल.

(ख) ज्या उमेदवारास पहिल्या पसंतीक्रमाखेरीज इतर पसंती क्रमांकावरील जागेचे वाटप झाल्यास आणि तो उमेदवार या वाटपाने संतुष्ट असल्यास आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्याची त्याची इच्छा नसल्यास, असा उमेदवार त्याच्या लॉग- इन मधून त्याला देऊ केलेली जागा स्वतः गोठवू शकेल. अशा प्रकारे जागा गोठविल्यावर असे उमेदवार प्रवेश उपस्थिती केंद्रावर जागा स्वीकृतीकरिता कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी व जागा स्वीकृती शुल्क भरण्यासाठी हजर होतील. तद्नंतर असे उमेदवार वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घेण्यासाठी वाटप करण्यात आलेल्या संस्थेमध्ये हजर होतील. अशा उमेदवारांकरिता, अशाप्रकारे करण्यात आलेले वाटप अंतिम असेल. असे उमेदवार जर प्रवेश उपस्थिती केंद्रावर जागा स्वीकृतीकरिता हजर झाले नाहीत तर, ते त्यांना वाटप करण्यात आलेल्या जागेवरील हक्क आपोआप गमावतील आणि ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र असणार नाहीत.

(ग) ज्या उमेदवारांना पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमावरील जागेचे वाटप करण्यात आले असेल आणि उमेदवाराने प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होऊन जागा स्वीकृतीच्या पुष्टीदाखल ती जागा स्वीकृत केली असेल, असे उमेदवार, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरीमध्ये वरच्या पसंतीक्रमावरील जागा मिळविण्याकरिता सहभागी होण्यास पात्र असतील.

(घ) ज्या उमेदवारांना पहिल्या पसंतीक्रमाखेरीज इतर पसंतीक्रमावरील जागेचे वाटप करण्यात आले असेल आणि त्या उमेदवाराने प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर न होऊन ती जागा स्वीकृत केली नसेल, असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पुढील फेरींमध्ये सहभागी होण्यास पात्र असतील.

(४) **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅप) दुसरी व तिसरी फेरी आयोजित करणे—**

(क) दुसऱ्या व तिसऱ्या फेरीकरिता उपलब्ध असलेल्या जागा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. संबंधित अशा, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीकरिता पात्र असलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने विकल्प नमुना भरण्यासाठी किंवा पूर्वीच्या फेरीसाठी भरलेल्या विकल्प नमुन्यामध्ये बदल करण्यास मुभा देण्यात येईल. या फेऱ्यांदरम्यान वाटप करावयाच्या जागा, खालील प्रवर्गांमध्ये येणाऱ्या पात्र उमेदवारांकरिता उपलब्ध असतील,—

(एक) वरील उप-नियम ३ (ग) व ३ (घ) अनुसार असलेले उमेदवार ;

(दोन) पूर्वीच्या कोणत्याही फेरीत कोणतेही जागावाटप न झालेले उमेदवार ;

(तीन) पूर्वीच्या प्रवेशफेरीत सहभागी झाले नव्हते (विकल्प नमुना भरला नव्हता) असे उमेदवार.

(ख) ज्या उमेदवारांना पहिल्या पसंतीक्रमाखेरीज इतर पसंतीक्रमावरील जागेचे वाटप करण्यात आले असेल आणि ज्यांनी प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होऊन जागा स्वीकृती केली आहे अशा उमेदवारांनी नवीन विकल्प नमुना भरताना, त्यांना पूर्वीच्या फेरीमध्ये अगोदरच वाटप झालेला पसंतीक्रम ते यादीत नमूद करणार नाहीत, जर वरच्या पसंतीक्रमानुसार जागेचे वाटप करण्यात आले की मग, त्याला अगोदर करण्यात आलेले वाटप आपोआप रद्द होईल. वरच्या पसंतीक्रमानुसार मग, त्याला जागेचे वाटप न केले गेल्यास, त्याचे पूर्वीच्या फेरीमधील वाटप अबाधित राहील ;

(ग) उमेदवारास तिसऱ्या प्रवेशफेरी नंतर वरच्या पसंतीक्रमावरील जागेच्या वाटपाची संधी असणार नाही. तिसऱ्या प्रवेश फेरीमध्ये सहभागी झालेल्या उमेदवारांना तिसऱ्या फेरीत करण्यात आलेले वाटप किंवा पूर्वीचे अबाधित ठेवण्यात आलेले वाटप हे अंतिम वाटप असेल ;

(घ) प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होऊन वाटप करण्यात आलेली जागा स्वीकृत करते वेळेस, उमेदवार अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करील. उमेदवाराने अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ मूळ प्रमाणपत्रे सादर केली नाहीत तर, जागावाटप आपोआप रद्द होईल व ती जागा पुढील फेरीमध्ये वाटपासाठी उपलब्ध होईल ;

(ङ) उमेदवारास प्रवेश उपस्थिती केंद्रावर मूळ प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळेस प्रवेश अर्जातील खाली दिलेल्या चुका दुरूस्त करून घेण्याची मुभा असेल जसे.—

(एक) पुरूष ऐवजी स्त्री किंवा स्त्री ऐवजी पुरूष असा लिंगातील बदल;

(दोन) परीक्षेत, सामाईक प्रवेश परीक्षेत उमेदवाराने मिळवलेले गुण भरताना केलेली चूक, तथापि, गुणांतील वाढीमुळे गुणवत्ता क्रमांकात होणारा बदल करण्यास परवानगी दिली जाणार नाही;

(तीन) मागासवर्गीय प्रवर्गातील जात, पोटजात किंवा प्रवर्ग भरताना झालेली चूक. परंतु कोणत्याही प्रकरणी सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारास मागासवर्गीय प्रवर्गात बदल करता येणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारास यथास्थिति आवश्यक कागदपत्रे उदा. जात / जमात प्रमाणपत्र, जात / जमात वैधता प्रमाणपत्र, उन्नत प्रवर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र इत्यादी, सादर करू न शकल्यास, त्यास आपला प्रवर्ग राखीव मधून सर्वसाधारण प्रवर्गात बदलता येईल ;

(चार) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्यामुळे अल्पसंख्याक दर्जा काढून टाकणे ;

(पाच) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्यामुळे विकलांग दर्जा काढून टाकणे ;

(सहा) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्यामुळे माजी सैनिक दर्जा काढून टाकणे ;

(सात) उमेदवारी प्रकारातील बदल ;

(आठ) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्यामुळे शिक्षणशुल्क माफी अंतर्गत जागा मिळण्यासाठीच्या पात्रतेचा दर्जा काढून टाकणे ;

(नऊ) शैक्षणिक अर्हतेत बदल करणे ;

दुरूस्तीच्या खंड (एक) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दुरूस्ती खेरीज कोणताही बदल करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(च) अतिरिक्त फेरी (कोणतीही असल्यास) त्याबाबतीत, वरील खंड (क) मध्ये नमूद केलेले उमेदवार, या फेरीत सहभागी होण्यासाठी हक्कदार असतील व ते नवीन विकल्प नमुना भरण्यास हक्कदार असतील. असा उमेदवार, नवीन विकल्प नमुना भरताना त्यांना पूर्वीच्या फेरीमध्ये वाटप झालेला विकल्प त्यांच्या पसंतीक्रमाच्या यादीत नमूद करणार नाहीत. एकदा वरच्या पसंतीक्रमानुसार नवीन जागेचे वाटप करण्यात आले की अगोदर करण्यात आलेले वाटप आपोआप रद्द होईल. वरच्या पसंतीक्रमांनुसार नवीन जागेचे वाटप न झाल्यास, पूर्वीच्या फेरीमधील वाटप अबाधित राहील ;

(५) उमेदवार त्यास अंतिमतः वाटप केलेल्या संस्थेमध्ये विहित वेळापत्रकानुसार उपस्थित राहील व त्या संस्थेतील आपला प्रवेश कायम करील. संस्था आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी करील व उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगइनमधून ताबडतोब अपलोड करील व त्या उमेदवारास प्रवेश कायम केल्याबाबतची ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती देईल.”

४. मुख्य नियमांच्या नियम १० मध्ये, उप नियम (१), मधील खंड (क) मध्ये,—

(१) टप्पा एक मध्ये,—

(एक) उप खंड (क) नंतर पुढील उपखंड समाविष्ट करण्यात येईलः-

“(क-१) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अनाथ उमेदवारांचा त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागांसाठी विचार करण्यात येईल, आणि जर त्यांच्यासाठी असलेल्या राखीव प्रवर्गात जागा उपलब्ध नसतील तर, त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे त्यांचा खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल. ” ;

(दोन) उप खंड (घ) आणि (ङ) ऐवजी पुढील उप खंड दाखल करण्यात येतील :—

"(घ) विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे त्यांच्या संबंधित प्रवर्गात त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल आणि, जर त्यांच्या संबंधित प्रवर्गातील अशा प्रकारच्या राखीव जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध नसतील तर, त्यांचा त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल ;

(ङ) संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्या संबंधित प्रवर्गातील त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल, आणि जर संबंधित प्रवर्गातील अशा प्रकारच्या राखीव जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध नसतील तर त्यांचा, त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल ; "

(२) टप्पा-पाच, टप्पा-सहा व टप्पा-सात वगळण्यात येतील.

५. मुख्य नियमांच्या नियम ११ मधील, खंड (३) मध्ये,

(एक) उपखंड (क) मधील नोंद (दोन) ऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

"(दोन) नियम १० च्या उपनियम (१) मधील टप्पा-एक ते टप्पा-चार; " ;

(दोन) उपखंड (ख) मधील नोंद (एक) ऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

"(एक) नियम १० च्या उपनियम (१) मधील टप्पा-एक ते टप्पा-चार आणि टप्पा-आठ; " ;

६. मुख्य नियमांच्या नियम १२ मध्ये,—

(एक) उपनियम (झ) मध्ये, "प्रवेश उपस्थिती केंद्रावर" या मजकुरानंतर, "जागा स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरतील किंवा" हा मजकुर समाविष्ट करण्यात येईल.

(दोन) उपनियम (त्र) ऐवजी पुढील उपनियम दाखल करण्यात येईल :—

" (त्र) प्रवेश देण्यात येणाऱ्या सर्व उमेदवारांसाठी जागा स्वीकृती शुल्क, रू.१,००० एवढे असेल. हे शुल्क ना-परतावा प्रक्रिया शुल्क म्हणून समजण्यात येईल ; " ;

(तीन) खंड (ड) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ढ) उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये प्रवेशासंबंधी केलेले कुठल्याही प्रकारचे विधान किंवा दिलेली माहिती वस्तुस्थितीशी विसंगत किंवा चुकीची असल्याचे कोणत्याही वेळी आढळून आल्यास, संबंधित संस्थेचे प्राचार्य अशा उमेदवाराचा प्रवेश रद्द करतील आणि त्याचे शुल्क जप्त करतील. प्रवेश रद्द केल्याच्या विरोधात उमेदवारास सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सात दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल. अशा प्रकारच्या अपिलावर सक्षम प्राधिकारी शक्यतो पंधरा दिवसांच्या आत निर्णय देईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

(ण) बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींचे कालबद्ध रीतीने अन्वेषण करण्यात येईल आणि जर अशा तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे आढळल्यास असे प्रवेश रद्द करण्यात येतील. त्याशिवाय सक्षम प्राधिकाऱ्यास उचित माहिती देऊन समुचित कार्यवाही करण्यात येईल. "

७. मुख्य नियमांच्या नियम १३ मध्ये,—

(एक) खंड (ग) मधील "आणि सक्षम प्राधिकारी यांचे संकेतस्थळावर त्यांनी निश्चित केलेले शुल्क भरून" हा मजकुर वगळण्यात येईल.

(दोन) खंड (ङ) मधील "संस्था" या मजकुराऐवजी " संस्था, आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करून" हा मजकुर दाखल करण्यात येईल.

(तीन) खंड (च), ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल.

"(च) विनिर्दिष्ट केलेल्या पाठ्यक्रमांच्या संस्थास्तरीय कोट्यातील जागा (अंशतः किंवा पूर्णतः) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करण्याचा उद्देश असणाऱ्या अल्पसंख्याक किंवा अल्पसंख्याकेतर संस्था, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतील जागांचे नियतवाटप प्रदर्शित करण्याच्या दोन दिवस अगोदर तसे कळवतील आणि त्या जागांचे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमांनुसार वाटप करण्यात येईल. तद्नंतर त्या संस्थांना संस्थास्तरीय कोट्यातील जागा परत करण्याची मुभा असणार नाही ; "

(चार) खंड (ज), ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ज) जर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या पार पडल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची जागा रिक्त राहत असेल किंवा होत असेल तर ती जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान ज्या प्रवर्गाकरिता राखून ठेवलेली होती, त्या प्रवर्गाच्या उमेदवारामधूनच भरण्यात येईल, तद्नंतरही त्या जागा रिक्त राहत असतील तर, त्या जागा अर्जदाराच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील. कला संचालनालय या जागा भरण्यासाठी विशेष प्रवेश (मॉप अप) फेरीचे आयोजन करील."

८. मुख्य नियमाच्या नियम १५, ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

**"१५. प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा, संस्थेने कागदपत्र परत करणे :—**

(क) उमेदवार प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला करील. उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने विनंती सादर केल्यानंतर त्या उमेदवाराचा प्रवेश रद्द झाला असे समजण्यात येईल. उमेदवाराने प्रणाली निर्मित अर्जाची यथोचितरित्या स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केली किंवा कसे हे विचारात न घेता, संस्था, उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने सादर केलेली विनंती अंतिम मानील. अशाप्रकारे जागा रद्द केल्यावर, उमेदवार त्या जागेवरील हक्क गमावील व ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. तद्नंतर, उमेदवार शुल्क परताव्याचा दावा करण्यास हक्कदार होईल व प्रणाली निर्मित अर्जाची यथोचितरीत्या स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केल्याच्या दोन दिवसाच्या आत, संस्था, प्रक्रिया शुल्क म्हणून रूपये १,००० वजा करून उर्वरित संपूर्ण शुल्काची रक्कम परत करील आणि संस्थेला सादर केलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे उमेदवारास परत करील;

(ख) वरील खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्राधिकाऱ्याने विहीत केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकाच्या दिवशी सायंकाळी ५ वाजल्यानंतर जर उमेदवराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केला असेल तर, उमेदवार प्रतिभूती ठेव आणि सुरक्षा धनठेव यांव्यतिरिक्त कोणत्याही शुल्काचा परतावा मिळण्यास पात्र असणार नाही ;

(ग) कोणतीही संस्था, जिच्याकडे एखाद्या व्यक्तीने तिची पदवी, पदविका किंवा अन्य कोणताही पुरस्कार किंवा इतर कागदपत्रे प्रवेशासाठी जमा केलेली असतील किंवा तिच्या ताब्यात असतील तर, ती संस्था अशा व्यक्तींवर अशा संस्थेमध्ये ती कोणताही अभ्यासक्रम किंवा अध्ययनक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतांना, कोणतेही शुल्क किंवा शुल्क भरण्यास दबाव टाकण्याच्या किंवा सक्ती करण्याच्या उद्देशाने अशी पदवी, पदविका, पुरस्कार किंवा इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाही;

(घ) संस्था, प्रवेश रद्द करण्याची विनंती करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रसंगी पुढील वर्षाचे शुल्क वसूल करण्यास हक्कदार असणार नाही. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश तिडके,**
शासनाचे उप सचिव.

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 5th July 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No. ADR-2019/C.R.76/T.E.6.—In exercise of the powers conferred by section 23 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Visual Art Course) Rules, 2017, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Visual Art Course)(Amendment) Rules, 2019.

2. In rule 4 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions to the Full Time Professional Visual Art Course) Rules, 2017 (hereinafter referred to as "the principal rules") sub-rule (3) shall be deleted.

3. For rule 9 of the principal rules, the following rule shall be substituted, namely :—

"9. Centralised Admission Process (CAP).—(1) The Unaided Private Professional Education Institution shall admit Candidates through the Centralised Admission Process as referred in Sub-section (*3*) of section 3 of the Act. The stages of CAP shall be as stated below,—

(*a*) Display or publishing of information Brochure by the Competent Authority;

(*b*) Filling Online Application Form by Candidate for participation in the Centralised Admission Process;

(*c*) Uploading of scanned images of valid necessary original documents as per the requirement of the admission while filling up online application form;

(*d*) Document Verification at Facilitation Centre by the Candidate. It is mandatory on the candidate's part to produce all original documents in support of the claim made in the application form;

(*e*) Display or publishing of provisional merit lists, submission of grievances, if any, and display or publishing of final merit lists ;

(*f*) Display of Category wise seats (Seat matrix) available for respective CAP Rounds;

(*g*) Filling up and confirmation of online option form having preferences of Courses and Institutions prior to respective CAP Rounds. Candidates may fill in preferences of Institutes and Courses in decreasing order of their preference as specified by Competent Authority. The option form once confirmed shall be considered for allotment in the respective CAP Rounds;

(*h*) Display of provisional allotment of respective CAP Rounds indicating allotted institute and Course;

(*i*) Reporting and accepting the offered seat at Admission Reporting Centre by the Candidate as per the schedule declared by the Competent Authority;

(*j*) Only after reporting to Admission Reporting Centre as per clause (i), the candidate should report to the allotted institute for seeking admission on the allotted seat as per final allotment in CAP rounds;

(*k*) The time schedule prescribed by the competent authority for compliances for various stages of CAP is mandatory.

(2) Conduct of CAP Round-L- The seats available for Round- I shall be published on the Website. The Candidate whose names appeared in the final merit list of CAP shall be eligible to participate in this round by filling online option form. The candidate shall fill and confirm the option form through candidate's Login.

(3) During the CAP:- (a) If a candidate is allotted the seat as per his first preference, such allotment shall be auto freezed and the candidate shall accept the allotment so made. Such candidate shall then not be eligible for participation in the subsequent CAP, rounds. Such candidates shall then report to Admission Reporting Centre for verification of documents and payment of seat acceptance fee. Thereafter such candidates shall report to the allotted institute and seek admission on the allotted seat. If such candidate does not report to Admission Reporting Centre for confirmation of seat acceptance, their claim on the allotted seat shall stand forfeited automatically and the seat shall become available for fresh allotment. For such candidate, the allotment so made shall be the final allotment ;

(b) Candidate who have been allotted seat other than the first preference given by the candidate and if the candidate is satisfied with such allotment and do not wish to participate in further CAP rounds, such candidate can freeze the offered seat through candidate's login. Once the candidate freezes the allotted seat, such candidate shall then * report to Admission Reporting Centre for verification of documents and payment of seat acceptance fee. Thereafter such candidates shall report to the allotted institute and seek admission on allotted seat. For such candidate the allotment so made shall be the final allotment. If such candidate does not report to ARC for confirmation of seat acceptance, their claim on the allotted seat shall stand forfeited automatically and the seat shall become available for fresh allotment. Such candidate shall then be not eligible for participation in the subsequent CAP rounds ;

(c) Candidate who have been allotted seat other than first preference and accepted the seat by reporting to ARC for confirmation of seat acceptance shall be eligible for participation in the subsequent rounds for betterment ;

(d) Candidate who have been allotted seat other than first preference and not accepted the seat by not reporting to Admission Reporting Centre for confirmation of seat acceptance shall be eligible for participation in the subsequent rounds ;

(4) Conduct of CAP Round-II and III.—

(a) The seats available for Rounds II and III shall be published on the website. The Candidates eligible for respective rounds II and III are allowed to fill in and/or edit online option form filled in by the candidate for the previous round. The seats to be allotted during these rounds shall be available to the eligible candidates falling under the following categories,—

(i) Candidates as per sub-rule 3(c) and 3(d) above;

(ii) Candidates who have not been allotted any seat in any of the previous rounds;

(iii) Candidates who did not participate (failure of filling option form) in previous rounds.

(b) Candidates who have been allotted seat other than first preference and reported to Admission Reporting Centre for confirmation of seat acceptance, whilst filling fresh option form,

he need not fill the preference already allotted to the candidate in the previous round. Once upward preference is allotted to such candidate, his earlier seat allotment shall stand automatically cancelled. In the event of no such upward preference is allotted, his previous allotment stands retained;

(*c*) There shall be no further betterment option available to the candidate after round III. The allotment made or allotment retained in round III for participating candidates in round III shall be final;

(*d*) At the time of reporting to Admission Reporting Centre for confirming the allotted seat, the candidate shall submit all the original documents in support of the claims made in the application. In the event the candidate fails to produce the documents in support of the claim, so made in the application, the allotment shall stand cancelled automatically and the seat shall become available for allotment in further rounds;

(*e*) The candidate will be entitled to rectify the following errors in the application form at the time of scrutiny of documents at Admission Reporting Centre *viz*.

(*i*) Change of gender from male to female and *vice-versa* ;

(*ii*) error while entering marks obtained by candidate in examination, CET. However the change in the merit number due to increase in the marks will not be permitted ;

(*iii*) error while mentioning the caste or sub-caste or the category of backward class but in no case a candidate will be allowed to change from General to Reserved Category. A reserved category candidate will be allowed to change his category from Reserved to General upon his failure to submit requisite documents like Caste or Tribe Certificate, Validity Certificate, Non-Creamy Layer Certificate etc., as the case may be;

(*iv*) removal of minority status due to failure of submission of supporting documents;

(*v*) removal of Disability status due to failure of submission of supporting documents;

(*vi*) removal of Defence status due to failure of submission of supporting documents;

(*vii*) Change in Type of candidature;

(*viii*) removal of Tuition Fee waiver seats (TFWS) status due to failure of submission of supporting documents;

(*ix*) Change in qualification.

No other change except specified in clause (*i*) to (*ix*) of rectification shall be allowed.

(*f*) In case of additional round (if any), the category of candidates mentioned in clause (*a*) above shall be entitled to participate and will be entitled to fill in fresh option Form. In such case, the candidate need not fill in the previously allotted preference in their preference list. Once the upward allotment is made, the earlier allotment shall stand automatically cancelled. In the event no such upward preference is allotted in this round, the candidate's previous allotment stands retained.

(5) The candidate shall report to the institution finally allotted to him and confirm his admission in institution as per the schedule. The institute shall verify the required documents and upload the admission of the candidates in the online system through Institute Login immediately and shall issue a system generated receipt of confirmation of admission to the candidate.".

4. In rule 10 of the principal rules, in sub-rule (*1*), in clause (*a*),-

(1) in Stage-I,

(*i*) after sub-clause (*a*), the following sub-clause shall be inserted, namely :—

"(*a-1*) Economically Weaker Section (EWS) and Orphan Candidates shall be considered for allotment of seats reserved for them as per their *Inter-Se-Merit*, and if seat is not available in their reserved category, then they shall be considered for allotment in Open Category as per the *Inter-Se-Merit*.";

(*ii*) for sub-clauses (*d*) and (*e*), the following sub-clauses shall be substituted, namely :—

"(*d*) Persons with Disability Category Candidates shall be considered for allotment of the seat reserved for them in their respective category, as per their *Inter-Se-Merit* and if seat in their respective Category is not available, then they shall be considered for allotment in Open Category as per their *Inter-Se-Merit*.

(*e*) Defence Category Candidates shall be considered for allotment of the seats reserved for them in their respective Category as per their *Inter-Se-Merit* and if seat in their respective reserve Category is not available then they shall be considered for allotment in Open Category as per their *Inter-Se-Merit*.";

(2) the Stage-V, Stage-VI and Stage-VII shall be deleted.

5. In rule 11 of the principal rules, in clause (3),—

(*i*) in sub-clause (*a*), for entry (*ii*), the following shall be substituted, namely :—

"(*ii*) Stages I to IV of sub-rule (*1*) of rule 10;";

(*ii*) in sub-clause (*b*), for entry (*i*), the following shall be substituted, namely :-

"(*i*) Stages I to IV and Stage VIII of sub-rule (*1*) of rule 10;".

6. In rule 12 of the principal rules,—

(*i*) in clause (*i*) after the words "Candidates has to pay" the words "seat acceptance fees through online mode or by" shall be inserted ;

(*ii*) for clause (*j*) following clause shall be substituted, namely :—

"(*j*) The Seat Acceptance Fee shall be Rs. 1,000/- for all admitted candidates the same shall be treated as nonrefundable processing fee,";

(*iii*) for clause (*n*), following clauses shall be substituted, namely :—

"(*n*) If any of the statement made in application form or any information supplied by the candidate in connection with his admission is found to be false or incorrect in any material particular, the Principal shall cancel his admission and forfeit the fees. An appeal against the action of cancellation of admission, may be preferred within seven days to the Competent Authority. The Competent Authority shall, preferably, decide the appeal within fifteen days and his decision thereon shall be final.

(*o*) Complaints regarding the use of fake certificates shall be investigated in time bound manner and if it is found that there is a truth in such complaint, such admission shall be cancelled. Further appropriate action shall be initiated with due intimation to Competent Authority.".

7. In rule 13 of the principal rule,—

(*i*) In clause (*c*) the words "and also on the website of the Competent Authority by paying charges as decided by the Competent Authority" shall be deleted ;

(*ii*) Clause (*e*), for the words "The institution shall" the words "The institution after verification of all required documents shall prepare and" shall be substituted ;

(*iii*) for clause (*f*), the following clause shall be substituted, namely :—

"(*f*) The Minority or Non-Minority institution intending to surrender the Institutional Quota (in part or full) of specified courses to the CAP shall communicate two days before the display of seat matrix of CAP Round I and the same shall be allotted as per the rules of CAP. The Institutes shall not be allowed to surrender Institutional Quota seats thereafter.";

(*iv*) for clause (*h*), the following clause shall be substituted, namely :—

"(*h*) If any CAP seat remains or becomes vacant after the CAP Rounds, then the same shall be filled in by the Candidate from the same Category for which it was earmarked during the CAP, further if the seats remain vacant then the seats shall be filled on the basis of *Inter-se-Merit* of the applicant. Directorate of Art shall arrange special (mop up) round to fill these vacant seats.".

8. For rule 15 of the principal rules, the following rule shall be substituted, namely :—

"15. Cancellation of Admission and Refund of fees, return of documents by Institutions.—

(*a*) The Candidate shall apply online for cancellation and submit duly signed copy of system generated application for cancellation of admission to the institution. Once the candidate submits online request for cancellation, his admission shall be treated as cancelled. The Institute shall consider the online request made by Candidate for cancellation as final irrespective of whether he has submitted duly signed copy of system generated application to the institute. Upon such cancellation, the candidate shall lose the claim on the seat and such seat shall become available for further allotment. The candidate shall then become entitled to and the Institute shall refund the entire fees to the candidate after deduction of Rs.1000/- towards processing charges and return all his original documents submitted to the institute within two days from submission of duly signed copy of system generated application to the institute ;

(*b*) Notwithstanding clause (*a*) above, candidate shall not be entitled to any refund of his fee except the Security Deposit and Caution Money Deposit if the online cancellation is effected by the candidate after 5.00 p.m. of the cut-off date prescribed by the Competent Authority;

(*c*) No Institution, who has in its possession or custody, of any document in the form of certificates of degree, diploma or any other award or other document deposited with it by a person for the purpose of seeking admission in such institution, shall refuse to return such degree, certificate award or other document with a view to induce or compel such person to pay any fee or fees in respect of any course or program of study which such person does not intend to pursue or avail any facility in such institution.

(d) The institution shall not entitle to recover the fees for the subsequent years from the student seeking cancellation of his admission at any point of time.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TIDKE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.